पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **२१/०९/२०१८** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२१/०९/२०१८** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.उषा ऊर्फ माई मनोहर ढोरे
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
६. मा.अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.आगळे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

----------

विषय क्र.३) प्रभाग क्र.१७, १८ व २२ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्र.४) प्रभाग क्र.१६ मधील सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल दुरुस्तीची कामे करणे कामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

विषय क्र.५) शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडूस पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर राज्यशासनाचे मान्यतेने नेमणूक करणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.३७ मधील फुलेनगर मधील एम.आय.डी.सी.जनरल ब्लॉकमध्ये आवश्यक ठिकाणी फुटपाथ कर्बींग करणे (सन २०१७-१८) कामाच्या जागेत बदल करणेबाबत – मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.०४ दिघी-बोपखेल मधील स्थापत्य विषयक विकास कामामध्ये बदल करणेबाबत - मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) ब मुख्यालय अंतर्गत चिंचवड एम.एस.गुरुत्व वाहिनी देखभाल दुरुस्ती भाटनगर नाल्यापर्यंत करणेचे कामाबाबत (निविदा क्र.१७/६-२०१५-१६) - मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०७/०९/२०१८ व १४/०९/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.सागर गवळी अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३४/२०१८, दि.३१/०३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता,अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.शिंदे सुरेखा संभा यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'ऍनेस्थिशियालॉजिस्ट (भूलतज्ञ)' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेचे वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक - ०२

दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – प्रशासन

सुचक : मा.माई ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३३५/२०१८, दि.३१/०३/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०९/२०१७ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.८०२/२०१७ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.०३/१२/२०१७ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.१८/१२/२०१७ रोजी पाचारण करण्यात आले होते. उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.०८/०१/२०१८ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती. प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना अनु.जाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली आहे. सबब, डॉ.नांगरे सुजाता नारायण यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेचे वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक - ०३
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सचिन भोसले
संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/०५/१७०/२०१८, दि.१८/०९/२०१८

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ब”क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१७, १८ व २२ या भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दौनंदिन वापरामुळे ना दुरुस्त होतात. स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१७, १८ व २२ मिळून ५७ ब्लॉक (सिट्स ३२३) इतकी सार्वजनिक शौचालये व १२ ब्लॉक (सिट्स ३०) इतके युरिनल्स आहेत. तसेच मनपाच्या शाळांमध्ये सुद्धा स्वच्छता गृहे आहेत. सदर स्वच्छता गृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्येकरण्यात आलेला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र/स्वच्छ भारत अभियान प्रकल्प अमलबजावणी कक्ष विभागाचे दि.२१/०५/२०१८ व दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्रांन्वये सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विनाविलंब करणे करिता त्यांचेकडे असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे विषयी सूचना केल्या आहेत. सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२२८ अ.क्र.१-डी वर र.रू.५,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी केली असता राज्यस्तरीय एस.एस.आर. सन २०१७-१८ चे मंजुर दरपृथ्थ:करणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.४१,७४,६७२/- इतकी येत आहे. सदर कामासाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता ठरावात या कामाला प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.५०,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक - ०४
दिनांक - २१/०९/२०१८ विभाग – ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी

संदर्भ – मा.अति. आयुक्त (२) यांचे पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/०४/११०/२०१८, दि.१८/०९/२०१८

मा.अति. आयुक्त (२) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या “ब” क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१६ या भागाचा समावेश होतो. सदर भागामध्ये नागरिकांसाठी व तरंगत्या लोकसंखेसाठी मनपाने विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छता गृहांची व्यवस्था केली आहे. सदर स्वच्छतागृह दौनंदिन वापरामुळे नादुरुस्त होतात. स्वच्छता गृहे सुस्थितीत ठेवणे शहराच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रभाग क्र.१६ मध्ये ६ ब्लॉक (सिट्स ५२) इतकी सार्वजनिक शौचालये व ३ ब्लॉक (सिट्स ९) इतके युरिनल्स आहेत. तसेच मनपाच्या शाळांमध्ये सुद्धा स्वच्छता गृहे आहेत. सदर स्वच्छता गृहांची कालबद्ध पद्धतीने दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर कामाचा समावेश सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्येकरण्यात आलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्वच्छ महाराष्ट्र/स्वच्छ भारत अभियान प्रकल्प अमलबजावणी कक्ष विभागाचे दि.२१/०५/२०१८ व दि.०३/०८/२०१८ रोजीचे पत्रांन्वये सार्वजनिक स्वच्छता गृहांची देखभाल दुरुस्तीची कामे विनाविलंब करणेकरिता त्यांचेकडे असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालय दुरूस्ती या लेखाशीर्षातून निविदा काढणे विषयी सूचना केल्या आहेत. सदर कामासाठी सन २०१८-१९ च्या मनपा अंदाजपत्रकामध्ये पान क्र.२२८ अ.क्र.१-डी वर र.रू. ५,००,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार समक्ष जागेवर पाहणी केली असता राज्यस्तरीय एस.एस.आर. सन २०१७-१८ चे मंजुर दरपृथ्थ:करणानुसार अंदाजपत्रक तयार केले असून निविदा र.रू.८,३९,२३९/- इतकी येत आहे. सदर कामासाठी एकत्रित प्रशासकीय मान्यता ठरावात या कामाला प्रशासकीय मान्यता उपलब्ध नाही. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रु.१०,००,०००/- इतकी येत आहे. सदर कामाला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २१/०९/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ : मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

कुमारी पूजा शंकर शेलार, वय वर्ष २४ वर्ष, शैक्षणिक अर्हता – बी.ए., राहणार – जय बजरंग चौक, भोसरी, पुणे – ४११ ०३९ या पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत वास्तव्य असलेल्या महिला खेळाडूस महाराष्ट्र शासनाचा खेळामधील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती पुरस्कार हा तिच्या कबड्डी या खेळातील योगदानाबद्दल प्राप्त झाला आहे. तरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त कुमारी पूजा शंकर शेलार या महिला खेळाडूची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर प्रशासन अधिकारी (गट-ब) या पदावर राज्यशासनाचे मान्यतेने नेमणूक करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २१/०९/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ : मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३७ (नविन प्रभाग क्र.२०) महात्मा फुलेनगर मधील एम.आय.डी.सी.जनरल ब्लॉक मध्ये आवश्यक त्याठिकाणी फुटपाथ कर्बींग करणे हे निविदा क्र.७३/५९-२०१७-१८ चे काम करणेत येत आहे. त्यानुसार प्रत्यक्ष ठिकाणी काम सुरु करणेत आले. परंतु मा.नगरसदस्य यांनी नविन प्रभागानुसार संत तुकारामनगर येथे आवश्यक ठिकाणी ब्लॉकची व इतर स्थापत्य विषयक कामे सदर कामातून करणेची मागणी केलेली आहे. तरी सदर निविदेच्या कामातून नविन प्रभाग क्र.२० येथे ब्लॉक व इतर स्थापत्य विषयक कामे करणेच्या स्थळबदलास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची तातडीने अंमलबजावनी करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – ०७

दिनांक – २१/०९/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ : मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३१ दिघी मधील नाल्यांची स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.५३/१७ – २०१७-१८ निविदा र.रु.१४,९८,८३७/- मधील अंदाजे र.रु.३,००,०००/- इतक्या रकमेचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित अंदाजे र.रु.१२,००,०००/- इतक्या रकमेची निविदा शिल्लक आहे. परंतु प्रभाग क्र.४ दिघी बोपखेल मधील स.नं.६६ येथील दफनभुमी मधील स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. सबब प्रभाग क्र.३१ दिघी मधील नाल्यांची स्थापत्य विषयक कामे करणे निविदा क्र.५३/१७ – २०१७-१८ या कामामधील उर्वरित रकमेमधून दिघी स.नं.६६ येथील दफनभूमी मधील स्थापत्य विषयक कामे करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ०८

दिनांक – २१/०९/२०१८

सुचक : मा.उषा ढोरे अनुमोदक : मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ : मा.उषा ढोरे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव –

ब मुख्यालय अंतर्गत चिंचवड एम.एस.गुरुत्व वाहिनीची देखभाल दुरुस्ती भाटनगर नाल्यापर्यंत करणे या कामांतर्गत चिंचवड एम.एस.गुरुत्व वाहिनीची देखभाल दुरुस्ती करणे असे आहे. सदर कामाची निविदा र.रु.३५,०१,३४४/- एवढी असून सद्यस्थितीत र.रु.१९,९८,१५५/- एवढया रकमेचे काम पूर्ण झाले आहे. सदर कामात र.रु.१५,०३,१८९/- एवढी रक्कम शिल्लक राहत आहे. सद्यस्थितीत प्रभाग क्र.१६ मध्ये पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती व देखभाल दुरुस्तीचे काम उपलब्ध नाही त्यामुळे उपरोक्त विषयांकित काम प्रभाग क्र.१६ मध्ये किवळे, विकासनगर, रावेत, मामुर्डी, साईनगर व इतर प्रभाग क्र.१६ मधील ठिकठिकाणी करणेत यावे. सद्यस्थितीत सदर भागात ब-याच प्रमाणात पाण्याच्या वितरण नलिकांमधून पाण्याची गळती होत असून महानगरपालिका परिसरातील पाणीपुरवठा सुस्थितीत व सुरळीत ठेवणेसाठी कामाची आवश्यकता आहे. त्यामुळे प्रभाग क्र.१६ मध्ये उपरोक्त काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/६२१/२०१८
दिनांक : २१/०९/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.